Sambodhi ISSN : 2249-6661
(UGC Care Journal) Vol - 43 No. - 04 (XII) October-December (2020)

# शरद पवार यांचे देशाच्या कृषी विकासातील योगदान...

**प्रा. नितीन लगड,**

**राज्यशास्त्र विभाग,**

**अण्णासाहेब मगर महाविद्यालय, हडपसर.**

**पुणे,२८**

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर कृषिमंत्री ती सुब्रमण्यम आणि केंद्रीय कृषी राज्यमंत्री डॉ. अण्णासाहेब शिंदे, ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. स्वामीनाथन यांच्या नेतृत्वाखाली हरितक्रांती, श्वेतक्रांती आणि निलक्रांती चा काळ सोडला तर पंधरा वर्षांचा कालावधी अत्यंत सुप्तावस्थेत गेल्याचे दिसते. हरितक्रांतीच्या काळात अत्यंत दिमाखदार कामगिरी केली गेली. अन्नधान्याचे उत्पादन २१० दशलक्ष टनांवर पोहोचले. देश अन्नधान्यात स्वयंपूर्ण झाला. जगात दुध उत्पादनात प्रथम क्रमांक मिळविला तर फळ पिकात दुसरा क्रमांक मिळवला. मात्र १९९० नंतर पुढची १० वर्षे निराशाजनक राहिली. एकंदरीत ही वाढ कासवगतीने झाली. अन्नधान्य,, पशुधन, मच्छी उत्पादन, रेशीम, वराह पालन, तसेच कुक्कुटपालन यांच्या उत्पादनात वाढ दिसली नाही; याउलट कडधान्ये, गळीत धान्ये ,ऊस, मसाले पिकांच्या उत्पादनात घट दिसू लागली. कृषी निर्यातीमध्ये फार मोठी घट झाली. रासायनिक खते, कीटकनाशके आणि तणनाशके यांच्या किमती वाढल्या. बागायती क्षेत्रातील पाण्याच्या बेसुमार वाढीमुळे जमिनीचा पोत बिघडला. अर्थातच त्याचा परिणाम उत्पादकतेवर झाला. लोकसंख्या वाढ आणि वारसाहक्काने जमिनीचे तुकडे झाले. शेतकऱ्यांच्या शेतीतून काहीच परवडण्याजोगे राहिले नाही. अशा परिस्थितीत देशाच्या कृषी क्षेत्राची जबाबदारी श्री. शरद पवार यांनी स्वतः स्वीकारली.तोट्यातील शेती क्षेत्राला नफ्यात आणून देशातल्या समस्त शेतकरी वर्ग संपन्न करणे ही त्यांची भूमिका होती.एकंदरीतच त्यांच्या कृषी क्षेत्रातील ज्ञानाचा व अनुभवाचा त्यांना खुशीच्या विविध योजना अमलात आणताना प्रचंड फायदा झाला.

भारतीय कृषी संशोधन परिषद भारताच्या कृषी विभागाची अत्यंत महत्त्वपूर्ण संशोधन संस्था आहे. जगातल्या सर्वोत्कृष्ट संशोधन तिथे होते. देशाचे कृषी मंत्री या संस्थेचे अध्यक्ष असतात. शरद पवार यांनी कृषी खात्याचा कार्यभार स्वीकारल्यानंतर या संस्थेच्या संशोधन आणि शिक्षण विभागाकडे बारकाईने लक्ष द्यायला सुरुवात केली. विविध फळे, भाजीपाला,, कडधान्ये,तृणधान्ये इत्यादींवर संशोधन करणारी संचालनालये या संस्थेत समाविष्ट आहेत. पिकांचे सुधारित वाण, संकरीत वाण, पिक उत्पादन वाढीसाठी जमीन, पाणी, ते तसेच काढणीपश्चा त तंत्रज्ञान इ. प्रश्नांची उकल करण्यासाठी ही संस्था काम करते. तसेच या अंतर्गत कृषी हवामानानुसार विभागवार उपसंस्था महत्त्वाचे संशोधन करीत आहेत.कृषी क्षेत्रात काम करणाऱ्या देशात साधारणतः ९६ राष्ट्रीय संस्था, मध्यवर्ती संस्था, संचालनालये, कृषी हवामानानुसार उपर संस्था आणि राष्ट्रीय केंद्रे या राष्ट्रीय संशोधन प्रणालीमध्ये कार्यरत आहेत.

मराठी खरं तर शरद पवार यांनी महाराष्ट्र राज्याचे कृषिमंत्री म्हणून जबाबदारी स्वीकार आल्यावर लगेचच पुढील वाटचालीची दिशा निश्चित केली. महाराष्ट्रातल्या अनेक जिल्हयात कित्येक वर्षे पुरेसा पाऊस पडत नव्हता व तेथील लोकांना भयानक दुष्काळाचा सामना करावा लागत होता. कृषी मंत्री झाल्यावर पुण्याच्या कृषी विद्यापीठात महाराष्ट्रातले सर्व कृषीतज्ज्ञ, कृषी विद्यापीठांचे कुलगुरू, नियोजनातील व्यक्ती यांची बैठक बोलावली. यावेळी सुप्रसिद्ध कृषी क्रांतीचे जनक डॉ. एम. एस. स्वामीनाथन हे देखील भारतीय कृषी संशोधन संस्थेचे (I.C.A.R.) या नात्याने हजर होते. ज्याप्रमाणे किमान रोजगार मिळवण्यासाठी ' रोजगार हमी योजना' असते अशी एखादी ' उत्पादन हमी योजना' आणली पाहिजे, अशी शरद पवार यांनी आपली भूमिका सांगितली., ज्वारी, गहू यांचे सुधारित किंवा संकरित बियाणे वापरून व योग्य पद्धतीने पिकांची काळजी घेऊन विशिष्ट प्रमाणात उत्पादन मिळाले पाहिजे, अशा प्रकारची योजना सर्व शास्त्रज्ञांनी तयार केली व एका ' उत्पादकता क्रांतीची त्यांनी सुरुवात केली'. राज्याचे कृषिमंत्री असताना त्यांना शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीची खूप काळजी असायची. शेतीतील कोण कोणत्या गोष्टींनी शेतकऱ्यांचे राहणीमान सुधारेल असा विचार त्यांनी केला. त्यातूनच त्यांनी शेतीतील विविध घटकांचा, विविध पिकांचा वापर वाढावा यासाठी प्रयत्न सुरू. शेतीचे विविधीकरण या विषयावर त्यांनी तीस वर्षांपूर्वीच विचार केला होता.१९७० च्या दशकाच्या सुरुवातीला त्यांचा हा विचार त्यांच्या द्रष्टेपणाची साक्ष देतो. भारतीय कृषी शास्त्राच्या इतिहासात संस्थांचे निर्माते म्हणून त्यांचे नाव चिर:काल घेतले जाईल..माहिती तंत्रज्ञान व जैवतंत्रज्ञान क्षेत्रातील संशोधन व शिक्षण संस्थांच्या स्थापनेसाठी

Copyright © 2020 Authors 

त्यांनी अथक प्रयत्न केले त्यांनी ज्या संस्थांची निर्मिती केली त्यात वैज्ञानिक विद्वत्ता व सामाजिक परिस्थिती यांची सांगड घालण्यात आली पाहिजेत असा त्यांचा नेहमीच आग्रह असतो.

तंत्रज्ञान व सार्वजनिक धोरण, उत्पादन व पीक तयार झाल्यानंतर चे तंत्रज्ञान व त्यावरील प्रक्रियेसाठी समन्वय असला पाहिजे, या., ऊस द्राक्षे, डाळिंब व अन्य पिकांसाठी त्यांनी संशोधन संस्था स्थापन केल्या, शिवाय पारंपरिक शेतीत व दुग्धोत्पादन व्यवसायातही आघाडी चे तंत्रज्ञान आणि ते अग्रेसर राहिले बारामती सारख्या दुष्काळी पट्टा देखील त्यांनी हिरवा गार केला. नेहमीच्या पिकां पेक्षा फळबाग पिके पशुसंवर्धन आल्यावर त्यांनी अधिक लक्ष दिले. नेहमी म्हणतात, कच्ची प्रक्रिया विरहित दूध विकू नका. त्याचे विविध पदार्थ, उपपदार्थ करून ग्राहकांकडून जास्त पैसे द्या जगातील उच्च तंत्रज्ञानाची सर्व साधने त्यांनी बारामतीला आणली; एवढेच नव्हे तर जागतिक दर्जाच्या ब्रिटानिया, नेसले सारख्या कंपन्यांचे उत्पादन तिथे सुरू केले.

फळबाग हा देखील त्यांचा आवडता विषय. दुग्ध व्यवसाय सारखाच पैसे मिळवून देणाऱ्या शेतकऱ्यांचा हक्काचा आणखी एक मार्ग म्हणजे फळबाग व फुलांची लागवड होय. त्यांच्या पुढाकारानेच महाराष्ट्रात फळांची क्रांती झाली. द्राक्ष,, डाळिंब, हळद अशा महाराष्ट्र आघाडीवर आहे. कमी पावसात येणारे अंजीर, डाळिंब, बोर या सारख्या दुष्काळी फळांवर त्यांनी जास्त भर दिला. पाण्याचा कमी वापर करून जास्तीत जास्त उत्पन्न मिळावे, अशी त्यांची भूमिका होती अगदी द्राक्ष सारख्या पिकांसाठी ठिबकचा वापर करण्याचा त्यांनी आग्रह धरला व तो यशस्वीही केला; म्हणजे पाणीबचत हे त्यांच्या पुढचे महत्त्वाचे उद्दिष्ट होते. इस्राइल सारख्या या क्षेत्रात प्रगत असलेल्या देशाकडून मार्गदर्शन व मदत घेऊन सर्वोत्कृष्ट सिंचन पद्धत त्यांनी भारतात विशेषतः महाराष्ट्रात राबविली. पाण्याच्या प्रत्येक थेंबातून अधिक पीक मिळवायचे (More Crop per Drop)हे त्यांचे सूत्र राहिले आहे. उत्पादन एकरी केव्हा आहे तरी मोजण्यापेक्षा पाण्याच्या परिमाणात मोजण्याचा विचार राजकीय नेतृत्व धोरण करता म्हणून त्यांनी प्रथमच. दुधाचे उत्पादन वाढवून, दुग्धजन्य पदार्थ विकून, फळबागा लावून तसेच फळांच्या प्रक्रियेतून मिळणारे पदार्थ विकून शेतकरी आर्थिक दृष्ट्या समृद्ध होऊ शकतो हे त्यांनी जगाला दाखवून दिले. म्हणूनच त्यांना ' महाराष्ट्राच्या फळबागा क्रांतीचे जनक' म्हणावे लागेल.

राज्याचे चार वेळा मुख्यमंत्री पदाची जबाबदारी त्यांनी. त्यांच्या काळात त्यांनी शेती संशोधन,शिक्षण व विस्तार कार्यक्रमाला जोरदार गती दिली. उत्पादकता आणि शेती उत्पादनाचा दर्जा राखण्याची जाणीव शेतकऱ्यांच्या व कृषी व्यवस्थापन करणार यांच्या मनात निर्माण करण्याच्या दृष्टीने काळाच्या बरेच पुढे ते होते. आज सर्वांना कळून चुकले आहे की, जागतिक स्पर्धेत टिकून राहायचे असेल तर कृषी उत्पादनाचा दर्जा उत्तम असणे अत्यंत महत्त्वाचे आहे. मुख्यमंत्री झाल्यानंतर त्यांनी एक अत्यंत महत्त्वाचा निर्णय घेतला. फळबाग लागवडीचा अंतर्भाव त्यांनी रोजगार हमी योजनेत केला. सहाजिकच मोठ्याप्रमाणावर पडीक असलेली जमीन फळपिकांच्या लागवडीखाली. हळद पिकांप्रमाणेच कापूस हे देखील नगर. कापूस उत्पादक शेतकऱ्यांना देखील काही बोनस मिळावा, अशी व्यवस्था त्यांनी केली. त्यांच्या या शेतकरी प्रेमामुळेच शेतकऱ्यांना ही वाटते. की शरद पवार यांनी कृषिमंत्रीच व्हावे. शेतीचे आधुनिकीकरण व्हावे याकडे त्यांचे सतत लक्ष असते. ते अमेरिका, इस्राईल, सारख्या अन्य देशात असतील, तर तेथील तंत्रज्ञान आपल्याकडे कसे वापरता येईल याकडे त्यांचे लक्ष असते. या सगळ्यात ज्ञानाचा वापर त्यांनी हॉर्टिकल्चर मध्ये मोठ्या प्रमाणावर केला आहे. त्यामुळेच त्यांना हायटेक हॉर्टिकल्चर चे जनक म्हणावे लागेल. हे कुणीच शरद पवार हे सुरुवातीला महाराष्ट्राचे आणि आता देशाच्या शेतकऱ्यांचे ' फ्रेंड, फिलोसोफर व गाईड' आहेत भारतातील शेती ही जागतिक स्पर्धेत टिकली पाहिजे वर्षे तिने जागतिक स्पर्धेत देखील आपले स्थान बळकट केले पाहिजे अशी शरद पवार यांची भूमिका राहिली आहे.

आधुनिक तंत्रज्ञान, जैवतंत्रज्ञान, माहिती तंत्रज्ञान याचा वापर करण्यासाठी ते नेहमीच प्रोत्साहन देत आहेत. त्याचबरोबर अवकाश तंत्रज्ञान व नॅनोतंत्रज्ञान यासारख्या तंत्रज्ञानाचाही ते विचार करतात. हे तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचले नाहीतर याचा काही उपयोग नाही, हे ते जाणून आहेत म्हणूनच ते शेतकऱ्यांच्या शिक्षणासाठी प्रयत्नशील असतात. त्यांच्या बारामतीतील विविध शिक्षण संस्थांतून हे कुणाच्याही लक्षात येईल. केवळ फलोत्पादनात नव्हे तर कुकूटपालन आताही महाराष्ट्र पुढे जावा यासाठी त्यांनी वेंकटेश्वरा सारख्या कंपन्यांना प्रोत्साहन दिले. कोंबड्यांसाठी लसी बनविण्यावर भर दिला,त्यामुळेच महाराष्ट्र या क्षेत्रात देखील आघाडीवर आहे. अशाप्रकारे काळाच्या पुढे राहून स्वतःच्या उदाहरणाने लोकांना प्रबोधन केले आहे. लालबहादूर शास्त्रींच्या ' जय किसान' या घोषणेला प्रत्यक्षात आणण्याचे काम त्यांनी केले आहे

कृषी संशोधनासाठी प्रयोगशाळेत आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुविधा, कोट्यवधी रुपये किमतीची शास्त्रीय उपकरणे, यंत्रे आणि परदेशातून आवश्यक साधनसामुग्री शरद पवार यांच्या प्रयत्नांमुळे सहज पणे मिळत होती. कृषीमंत्री पदाची जबाबदारी सांभाळत असताना संशोधनासंबंधी ची कोणतीही फाईल त्यांच्या टेबलवर 24 तासांपेक्षा जास्त वेळ राहत नसते इतकी त्यांची या क्षेत्राबद्दल कटिबद्धता आहे.महाराष्ट्रातील चार कोटी शेतकऱ्यांच्या मनात यामुळेच प्रेम आणि जिव्हाळा आहे. रोजगार हमी अंतर्गत फलोत्पादन असोत किंवा संपूर्ण कर्जमाफीचा शासकीय निर्णय असो, तराजू चा काटा शेतकऱ्यांच्या बाजूने झोपणार एवढी खात्री सामान्य शेतकऱ्याला आहे म्हणूनच मध्य प्रदेश आणि राजस्थानच्या तत्कालीन कृषिमंत्र्यांनी देखील आमच्या पक्षाचे केंद्रातले सरकार गेले असल्याचे दुःख वाटत असले तरी केंद्रात कृषिमंत्री परी शरद पवार आले याचा आनंद व्यक्त केला. खरेतर हा त्यांच्या शेतीविषयक कार्याचा गौरव होता. कृषिशास्त्रज्ञ प्रमाणेच अंतराळ संशोधन ' सी एस आय आर' मधील शास्त्रज्ञ नाही त्यांनी विकास प्रक्रियेमध्ये आपलेसे केले होते. मुंबई पशुवैद्यक महाविद्यालय आणि माटुंगा येथील कापसाचे मध्यवर्ती केंद्र येथे अद्ययावत प्रयोगशाळा स्थापन करण्यात त्यांचा सिंहाचा वाटा राहिला आहे. पारंपरिक शेती आणि दुग्धोत्पादन व्यवसायातही आघाडी चे तंत्रज्ञानानं यात अग्रेसर राहील. आर्थिक सुधारणा करताना शेती क्षेत्र व पूरक व्यवसायही गती आली पाहिजे, या त्या व आज. या देशातील शेती व्यवसायातील सुधारणा घडवून आणण्यासाठी आधुनिक दृष्टीची व शास्त्रीय ज्ञानाची, तंत्रज्ञानाची गरज असल्याची जाणीव सर्व प्रथम महात्मा ज्योतिराव फुले यांना झाली होती, तोच पुरोगामित्वाचा वारसा स्वीकारून राज्यात कृषी मंत्री झाल्यावर कृषी पिके व उत्पादनाची प्रदर्शने भरवून आदर्श शेतकऱ्यांचा गौरव करण्याची प्रथा पहिल्याप्रथम शरद पवार यांनी सुरू केली. दररोज 18 तास काम करून, ेतकर्यां मध्ये जाऊन त्यांच्यात विश्वास निर्माण करण्याचे काम त्यांनी केले. त्यांचे हे कृषिक्षेत्रातील पवित्र योगदान महाराष्ट्र कदापि विसरणार नाही.

❑❑❑

Copyright © 2020 Authors 